प्रति,
श्री. /श्रीमती प्र. प्र. सह. संचालक नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका
सदरची लक्षवेधी दि. / / 20
रोजीच्या मा. महासभेकरिता प्राप्त झालेली आहे. पुढ माहितीसाठ
अग्रेषित करण्यात येत आहे


# ध्रुवकिशोर पाटील
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी – महाराष्ट्र शासन


मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. २/३/२०२१-२२
दिनांक:- ३०/८/२०२१

दि.३०/०८/२०२१

## दि.०२/०९/२०२१ रोजीच्या मा. महासभेकरीता
## // लक्षवेधी //

प्रति,
मा. नगरसचिव
नगरसचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय - मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील जुन्या इमारतीवरील वेदरशेड व इमारती दुरुस्तीकरीता परवानगी घेणेबाबत मनपा तर्फे पाठविण्यात आलेल्या नोटीसांमुळे शहरातील नागरिकांमध्ये संभ्रम व असंतोष पसरला असल्याने दि.०२/०९/२०२१ रोजीच्या मा.महासभेत याबाबत प्रशासनाचे लक्षवेधीमार्फत निर्दशनास आणुन देत आहे.**

महोदय,

इमारतीच्या टेरेसमध्ये पावसाचे पाणी साचुन, पाणी झिरपुन स्लॅबमधुन गळती, भिंतीमध्ये पाणी झिरपणे इ. मुळे तेथील रहिवाशांची गैरसोय होत होती. त्यामुळे बहुतांश इमारतींच्या टेरेसवर वेदरशेड टाकले आहेत.

मा.महासभा दि.१६/०१/२००९, ठराव क्र. ८३ अन्वये पालिकेने फक्त परवानगी फी आकारुन इमारतींना वेदरशेडची परवानगी द्यावी तसेच वेदरशेडला घरपट्टी कर आकारण्यात येऊ नये असा ठराव पारीत करण्यात आला होता.

तसेच मा.महासभा दि.०८/११/२०१७, ठराव क्र.२१ अन्वये निवासी इमारतींवर वेदरशेडसाठी ०४ महिन्यांऐवजी ०१ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देऊन प्रत्येक वर्षी नुतनीकरण करावे असा ठराव संमत झालेला होता.

ठराव पारित करुनही ठरावाची अंमलबजावणी न करता काही प्रभाग अधिका-यांनी जाचक कागदपत्रांची मागणी करुन अवास्तव फी आकारुन परवानगी घेण्याची वा दंड आकरण्याची, शेड तोडण्याची इशारा वजा धमकीच्या नोटीसा रहिवाशी इमारतींना दिलेल्या आहेत.

तसेच नविन व जुन्या निवासी इमारतींचे टॅरेस लिकेज, भिंतीचे क्रॅक फिलिंग, प्लास्टरींग, रंगकाम केले जाते जेणेकरुन इमारतींची Strength व इमारतींचे आयुष्य वाढते व रहिवाश्यांची गैरसोय दुर होते. अशा निवासी इमारतींना सुध्दा दुरुस्ती परवानगी घेण्याची नोटीस पाठविली जाते.

रहिवास इमारतींना दुरुस्ती परवानगी घेण्याचा नियम D. C. Rule मध्ये नाही तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्येही तरतुद नसताना प्रभाग अधिका-यामार्फत नागरिकांची पिळवणूक व छळ सुरु आहे.

काही प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम (चाळी, रिसॉर्ट, वाणिज्य गाळे) राजरोजसपणे सुरु आहेत. याकडे प्रभाग अधिकारी यांचे लक्ष नाही. मा.महापौर यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना प्रभागातील अनधिकृत बांधकामे व त्यावर केलेली कार्यवाही याचा सविस्तर अहवाल देण्यास कळविले होते. तसेच मा. महापौर यांनी याबाबत स्मरणपत्र दिल्यानंतरही काही प्रभाग अधिकाऱ्यांनी अद्याप अहवाल दिलेला नाही. **याचा अर्थ काय घ्यावा?**


संपर्क कार्यालय : ६, पद्मावती, नारायण नगर, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१.
Email : dhruvkishor.patil@gmail.com • Website : dhruvkishor.com • Mob. : 98202 96597 • 9004 099 099

**ध्रुवकिशोर पाटील**
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी – महाराष्ट्र शासन

प्रभाग समस्या मुक्त करणे हे प्रभाग अधिकारी यांचे कर्तव्य आहे. पण आजही अनधिकृत फेरीवाले यांनी शहरात धुमाकुळ घातलेला आहे. दिवसेंदिवस अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या वाढत असुन वाहतुकीची कोंडी होवून पायी चालणा-या नागरिकांची गैरसोय होते. तसेच रस्त्यावरील अनधिकृत गॅरेजस, रस्त्यावर पार्क असलेली बेवारस वाहने, दुकानदारांनी फुटपाथवर ठेवलेले सामान या बाबींमुळे समस्याग्रस्त शहर झालेले आहे. या समस्यांवर प्रभाग अधिकाऱ्यांचे लक्ष नाही, कारवाई नाही.

अनेक सन्मा. सदस्यांनी उपरोक्त विषयांबाबत पत्रव्यवहार करुनही व मा. आयुक्त यांनी राबविलेला **"Walk with Commissioner"** कार्यक्रम करुन सुध्दा काही प्रभाग अधिकारी काम करीत नाही.

तरी मा. महासभेत लक्षवेधी मार्फत चर्चा घडवून मी प्रशासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे.

(ध्रुवकिशोर पाटील)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

संपर्क कार्यालय : ६, पद्मावती, नारायण नगर, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१.
Email : dhruvkishor.patil@gmail.com • Website : dhruvkishor.com • Mob. : 98202 96597 • 9004 099 099